# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दुरध्वनी क्र . : २५८२९५८२
फॅक्स क्र . : २५८०५३९८

उप-प्रादेशिक कार्यालय, ठाणे-२
कार्यालय संकुल इमारत,
५ वा मजला, वागळेइस्टेट,
मुलुंड चेकनाका,
ठाणे (प) - ४०० ६०४

जा. क्र . मप्रनि/उप-प्राकाठा-२/ 2960 दिनांक :२८/८/२०१४

प्रति, 140828 FT0201

१. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे- ४०० ६०१
२. प्रधान सचिव (पर्यावरण) आणि अध्यक्ष, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र विनियमन समिती, पर्यावरण विभाग, रुम नं. २१७, मंत्रालय, मुंबई - ३२
३. सहाय्यक सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, दुसरा ते तिसरा मजला, सिनेप्लॅनेट सिनेमा, सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व), मुंबई - २२
४. मिरा - भाईंदर महानगरपालिका (शहरी विकास आराखडा विभाग), मुख्य कार्यालय भाईंदर, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प), ता. जि. ठाणे
५. उपवन अधिकारी, वन विभाग, मॅरेथॉन सर्कल, लाल बहादुर शास्त्री मार्ग, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
६. महा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पहिला मजला, एम.आय.डी.सी. कार्यालय संकूल इमारत, मुलुंड चेकनाका, ठाणे - ४०० ६०४

विषय:- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सागर तटीय विनियमन क्षेत्र प्रारुप नकाशा बाबत (CRZ Notification) S.O. १९ (E) दि. ०६ जानेवारी २०११ मधील तरतुदीनुसार पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अधिसुचना दि. १४.०९.२००६ मधील पध्दतीप्रमाणे जनसुनावणी घेण्यासंबंधी..

महोदय,

मेसर्स मिरा भाईंदर महानगरपालिका, मिरा भाईंदर, जिल्हा. ठाणे यांचा सागरी किनारी क्षेत्र व्यवस्थापन आराखडयास मंजूरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास महाराष्ट्र किनारपट्टी विकास प्राधिकरण पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेद्वारे प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावित आराखडयाबाबत जनसुनावणी हि पर्यावरण अधिनियम २००६ व सुधारित २००९ तसेच सागरी तटीय विनियमन अधिनियम दि. ०६.०१.२०११ नुसार घेणे बंधनकारक आहे. सदर प्रस्तावित आराखडयास केंद्रशासनाच्या व पर्यावरण मंत्रालयाच्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अधिसुचना क्र. S.O.1533 दि. १४.०९.२००६ नुसार मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०.०९.२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता मॅक्सस बँक्वेट, तिसरा मजला, मॅक्सस मॉल, १५० फिट मार्ग, विशाल अपार्टमेंट समोर, भाईंदर पूर्व-पश्चिम उड्डान पूला जवळ, भाईंदर (प), जि. ठाणे - ४०१ १०१ येथे जनसुनावणी घेण्याचे आयोजिले आहे.

सदर प्रस्तावित आराखडयाची माहिती असलेली कार्यकारी सारांशाची मराठी व इंग्रजी मधील एक-एक प्रत तसेच त्याबाबतचा अहवाल, प्रस्तावित सागरी किनारी क्षेत्र व्यवस्थापन नकाशा व हे संच सि.डी. च्या स्वरुपात देखील सोबत जोडले आहेत. सदर दस्तावेज संबंधित व्यक्तीना अभ्यासाकरीता उपलब्ध करुन देण्यात यावेत, अशी विनंती आहे. सदर प्रस्तावित आराखडयाबाबतच्या जनसुनावणीची जाहीर सुचना दिनांक २८.०८.२०१४ रोजीच्या इंडियन एक्सप्रेस (इंग्रजी) व दैनिक सकाळ (मराठी) या वर्तमानपत्रांमध्ये मंडळामार्फत प्रकाशित करण्यात आलेली असून त्याच्या छायांकित प्रती सोबत जोडलेल्या आहेत. ही जाहीर सुचना जनतेच्या माहितीकरीता आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात यावी व जनसुनावणी बाबतच्या जाहीर सुचनेस आपल्या कार्यालयातर्फे सुध्दा व्यापक प्रसिध्दी मिळेल, असे पहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

28/8/14

उप- प्रादेशिक अधिकारी, ठाणे -२

सहपत्र : वरिलप्रमाणे

प्रत सादर:-
१. प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, ठाणे
2. सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), म.प्र.नि. मंडळ, सायन, मुंबई - 22
3. माहिती कक्ष, मुख्यालय, म.प्र.नि. मंडळ, सायन, मुंबई - 22 (ESL)
— उपरोक्त जाहिर जनसुनावणी बाबतची माहिती मंडळाच्या संकेत स्थळावर देण्याची कृपा करावी. (सोबत - सहपत्र व माहितीची सीडी)